# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१५ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २२६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wedmesday 15 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 226 | Pages 4 | Rate 4 Rs


## अशोक खरातचा एन्काउंटर होण्याची शक्यता

**मुंबई**–नाशिकमधील अशोक खरात प्रकरणावरून आता राजकीय वातावरण तापलं आहे. काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी या प्रकरणात अत्यंत गंभीर आरोप करत खळबळ उडवून दिली आहे. अशोक खरातचा एन्काउंटर होण्याची शक्यता असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, या प्रकरणात अनेक प्रभावशाली लोकांची नावे समोर येण्याची शक्यता असून, ती बाहेर येण्यापूर्वीच त्याला संपवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. या विधानामुळे राज्यातील राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन केल्यानंतर माध्यमांशी बोलताना प्रणिती शिंदे यांनी हा गंभीर आरोप केला. त्या म्हणाल्या की, अशोक खरात प्रकरण केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून, यामध्ये सत्ताधारी पक्षातील काही नेते आणि मंत्र्यांचीही नावे समोर येऊ शकतात. त्यामुळे या सर्व गोष्टी उघड होण्याआधीच त्याचा एन्काउंटर केला जाऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या या विधानामुळे प्रकरणाला आणखी राजकीय रंग चढला आहे.

# घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त-राज्यपाल जिष्णु देव वर्मा

## जागतिक अर्थव्यवस्थेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही कालसुसंगत-मुख्यमंत्री फडणवीस

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हे समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. त्यांच्या विचारांमुळेच वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांना आत्मसन्मान, समान संधी, न्यायाचा मार्ग मिळाला आहे. संविधानातील घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त झाली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महापौर रितू तावडे उपस्थित होते.राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीतही डॉ. आंबेडकर अग्रणी होते. महिलांना शिक्षण, संपत्ती आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.**

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

त्यांच्या योगदानामुळेच भारत प्रजासत्ताक झाल्यापासून महिलांना समान मतदानाचा अधिकार मिळाला. महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होत असून, या निमित्ताने जातीयतेपासून मुक्त आणि भेदभावविरहित समाज घडविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक दृष्टिकोन, चलनव्यवस्था आणि आर्थिक स्थैर्य याविषयीचे विचार आजही कालसुसंगत आहेत. जागतिक पातळीवर अर्थकारणात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधिक असल्याचे सांगून जागतिक अर्थव्यवस्थेतही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील त्यांच्या संशोधनातून डॉ. आंबेडकरांनी भारतात केंद्रीय बँकेची गरज अधोरेखित केली होती. त्यांच्या विचारांवर आधारितच पुढे रिझर्व बँक ऑफ इंडिया ची स्थापना झाली. तसेच 'गोल्ड स्टँडर्ड' आणि चलनाच्या खरेदी शक्तीबाबत त्यांनी मांडलेले विचार आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतही मोलाचे ठरत आहेत. त्यांच्या 'प्रॉब्लेम्स ऑफ रुपी' या प्रबंधातून रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचा पाया रचला गेला. १९२३ मध्ये डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या आर्थिक विचारांच्या आधारावरच आज जग वाटचाल करत आहे. त्यांच्या प्रबंधात मांडलेल्या तत्त्वांवरच भारताची अर्थव्यवस्था उभी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हाच आपला राष्ट्रधर्म असून बाबासाहेब हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नसून माणुसकीचेही शिल्पकार आहेत. त्यांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे देशातील शेवटच्या माणसालाही न्याय आणि सन्मान मिळण्याचा मार्ग सुकर झाला, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. महापुरुष शांततेतून जेव्हा कृती करतात, तेव्हा ती क्रांती ठरते. महाड चवदार तळे सत्याग्रहातून समाजात आत्मसन्मानाची जाणीव निर्माण झाली. बाबासाहेबांनी आयुष्यभर शोषित, दलित आणि वंचित घटकांसाठी काम करून त्यांना सक्षम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे भारताची लोकशाही जगात भक्कमपणे उभी आहे. इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम वेगाने सुरू असून हे स्मारक पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.भारतभर साजरी होणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही स्वाभिमान आणि विवेकाचा उत्सव असून त्यांचे विचार जपणे आणि ते आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही प्रेरणा, संकल्प आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा तसेच त्यांच्या विचारांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. डॉ. आंबेडकर यांच्या मानवकल्याणाच्या विचारांना पुढे नेणे आणि



समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन देशाचा सर्वांगीण व वेगवान विकास साधणे हेच त्यांना खरे अभिवादन असल्याचे त्यांनी सांगितले. चैत्यभूमी ही बाबासाहेबांच्या विचारांचे ऊर्जा केंद्र असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदेतज्ज्ञ, घटनातज्ज्ञ आणि अर्थतज्ज्ञ होते. एकता, समता आणि बंधुता या मूल्यांमध्ये समाजाला बांधून त्यांनी प्रत्येकाला सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांची मशाल सतत तेवत ठेवून त्यानुसार आचरण करणे गरजेचे आहे. इंदू मिलच्या जागेवर उभारण्यात येत असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक जगाला शांतता आणिसमतेचा संदेश देणारे केंद्र ठरेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला. सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांनी पुष्प अर्पण करून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते सर्व भिक्खूंना चिवरदान देण्यात आले. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली. यावेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या एक वर्षाच्या कामकाजावर आधारित 'समाजनायक संजय शिरसाट' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी यावेळी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास आमदार कालिदास कोळंबकर, आमदार दीपक केसरकर, आमदार सना मलिक, माजी खासदार राहुल शेवाळे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे माजी खासदार राहुल शेवाळे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर, भन्ते डॉ.राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आदींसह समाजाच्या सर्वक्षेत्रातील मान्यवर तसेच डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज बसस्थानकात अक्षर सेवाभावी संस्था व शिक्षक मित्रपरिवाराकडून पाणपोईचे लोकार्पण

## महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी सामाजिक उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची नुकतीच साजरी झालेली जयंती. व काल भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून बसस्थानक केज येथे अक्षर सेवाभावी संस्था व मित्रपरिवार यांच्या वतीने थंडगार जार पाणपोई सुरू करण्यात आली. तिला पाच वर्षापासून ही परंपरा अखंडित सुरू आहे केज पोलिस स्टेशनचे निरिक्षक श्री स्वनिल उनवणे , एस टी आगारप्रमुख श्री चौरे , केज गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे यांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून थंडगार जार पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी, पोलिस निरीक्षक स्वप्निल उनवणे म्हणाले ,उन्हाची वाढती तीव्रता या अनुशंगाने पाणपोईचे महत्व विशद केले तर केज गटशिक्षण कार्यालयाचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री दत्तात्रय चाटे यांनी खेड्यापाड्यातील सर्वसामान्य प्रवाशांची पिण्याच्या पाण्याची सोय झाल्यामुळे अक्षर परिवार, व शिक्षक मित्र परिवार यांचे कौतूक केले. कार्यक्रमास, संजय चवरे , जी बी गदळे , आश्रुबा सोनवणे , सर्वज्ञ कडमीचे संचालक दत्तात्रय बांगर, जनार्धन सोनवणे, विवेक ढोकर, बाळासाहेब देशमुख, सतीश देशमुख, गणेश नांदे, बळी जाधव, बाळासाहेब बचुटे, जयदिप देशमुख, चंद्रकांत मोरे, किशोर भालेराव, युवराज हिरवे, चैतन्य तांबवेकर व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विक्रम डोईफोडे यांनी केले तर आभार व्हि एम यादव यांनी व्यक्त केले.

# धडगाव पोलिसांकडून जप्त दुचाकी-चारचाकी वाहनांचा लिलाव; मालकांना कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन



दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी । मोलगी**

धडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेल्या तसेच बेवारस अवस्थेत आढळलेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या वाहनांबाबत संबंधित मालकांनी आवश्यक कागदपत्रे सादर करून ती ताब्यात घ्यावीत, अन्यथा लवकरच या वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांनी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धडगाव पोलीस ठाण्यात गेल्या काही वर्षांपासून विविध प्रकरणांत जप्त केलेल्या सुमारे ११ दुचाकी व ४ चारचाकी वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात पडून आहेत. ही वाहने ऊन, वारा व पावसामुळे खराब होत असून त्यांची किंमतही घटत चालली आहे.यामुळे संबंधित वाहनमालकांनी पुढील सात दिवसांच्या आत पोलीस ठाण्यात येऊन वाहनांचे आवश्यक कागदपत्र सादर करावे व आपली वाहने ताब्यात घ्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. दिलेल्या मुदतीत कोणीही पुढे न आल्यास संबंधित वाहनांची मालकी हक्काची खात्री करून उर्वरित वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.तसेच जप्त वाहनांचे क्रमांक, चेसिस क्रमांक व संबंधित तपशील धडगाव पोलीस ठाण्यात उपलब्ध असून नागरिकांनी याची नोंद घेऊन तात्काळ संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# केज शहरातील सर्वज्ञ करियर अकॅडमीचा यशाचा झेंडा,१५ विद्यार्थ्यांची पोलीस भरतीत बाजी,आई- वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवा-डॉ.हनुमंत सौदागर

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

जिद्द,प्रयत्न,सातत्य, आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून परिश्रम घेतल्यास यश निश्चित प्राप्त होते असे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.ते केज येथील सर्वज्ञ करियर अकॅडमीत पोलीस भरती मध्ये निवड झालेल्या १८ विद्यार्थ्यांसह पालकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी ते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. हनुमंत सौदागर,प्रमुख उपस्थिती विक्रम डोईफोडे,विष्णू यादव, रामदास वाघमारे,श्री. रसाळ,शिवाजी मिसाळ, संचालक दत्ता बांगर, अमोल गुंठाळ,सतीश शिंदे,श्रीमती बांगर, आदींच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचा सत्कार करण्यात आला.यामध्ये अंगद बिक्कड(कोल्हापूर पोलीस),केशव माळी (पुणे शहर पोलीस), ज्ञानेश्वर राऊत (पुणेशहर पोलीस),अशोक गवळी (धाराशिव पोलीस), युवराज काळे (बीड पोलीस),महेश राऊत (बीड पोलीस),आरती जाधव (वर्धा पोलीस) प्रतीक्षा मुंडे (धुळेपोलीस) रूपाली चाटे (सोलापूर ग्रामीण पोलीस),गजानन डोईफोडे (आर्मी),वैभव माळी (आर्मी),अभिषेक शिंदे (आर्मी),कृष्णा केदार (आर्मी),ज्ञानेश्वर बांगर (आर्मी),सर्जेराव वनवे




(आर्मी),महेश गायकवाड (विद्युत सहाय्यक),परमेश्वर घुले (विद्युत सहाय्यक)आदीं ची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी डोईफोडे म्हणाले ऊसतोड मजुरांच्या मुलांनी यश संपादन करून आई-वडिलांच्या हातातील कोयता खाली ठेवला याचा आनंद असल्याचे मत व्यक्त केले पुढे बोलताना डॉ.हनुमंत सौदागर म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि क्षमता आहे. यामुळेच ते चमकले जातात असे मत व्यक्त केले.यशस्वी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना मेहनत घेतल्याचे फळ मिळाले अंगावर खाकी वर्दीचे स्वप्न साकार झाले असे मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी मैदानी चाचणी आणि लेखी परीक्षेसाठी रात्रंदिवस मेहनत घेतली.ग्रामीण भागातील आणि सामान्य कुटुंबातील मुलांनीअत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हे यश मिळवले असल्याचा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डोईफोडे यांनी केले आभार बांगर यांनी मानले.

# केज येथे भाजपाच्या प्रशिक्षण अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद, त्याग,निष्ठा,सेवाभाव, सर्मपण राष्ट्रभक्ती हेच खरे भाजपाच्या कार्यकर्त्याचे अलंकार-भाजपा प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदार संघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानास सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार सौ. नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या विशेष लक्षामुळे हे प्रशिक्षण नियोजनबद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.वसुंधरा माध्यमिक विद्यालय,केज येथे आयोजित या प्रशिक्षण शिबिरात भाजपा प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.यावेळी अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते बळीराम राख होते.यावेळी बोलताना राम कुलकर्णी म्हणाले की,भाजपाचा कार्यकर्ता हा स्वतःच्या स्वार्थासाठी काम करणारा नसून त्याग, निष्ठा,सेवाभाव आणि राष्ट्रभक्ती या मूल्यांनी सजलेला असतो.'प्रथम राष्ट्र,नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः हा विचार अंगीकारून कार्यकर्त्यांनी काम करणे आवश्यक आहे.ते पुढे म्हणाले की, कार्यकर्त्यांनी पक्षाची विचारसरणी,संस्कृती आणि तत्त्वज्ञान समजून घेतले पाहिजे.समाजाचा पक्षावर वाढलेला विश्वास टिकवून ठेवण्यासाठी शुद्ध आचरण, सकारात्मक भूमिका आणि जनसंपर्क महत्त्वाचा आहे. कार्यकर्ता हा पक्ष मजबुतीचा पाया असून शिस्तबद्ध,नियोजनबद्ध आणि सेवाभावातून काम केल्यास समाज मान्यता निश्चित मिळते, असे त्यांनी नमूद केले.



तसेच,कार्यकर्त्यांनी आपापसातील मतभेद, गटतट टाळून एकजुटीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.तोंडात साखर,डोक्यात बर्फ आणि पायात चक्र हे सक्रिय कार्यकर्त्याचे खरे अलंकार असल्याचे त्यांनी सांगितले.आगामी काळात पक्ष व नेतृत्वावर निष्ठा ठेवून कठोर परिश्रम करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. सुमारे चाळीस मिनिटांच्या भाषणात त्यांनी कार्यकर्ता कसा असावा व त्याची कार्यपद्धती कशी असावी यावर परखड मार्गदर्शन केले.बीड जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न अर्थात नगर बीड परळी रेल्वे तो आपल्या नेत्या मा.ना. पंकजाताई साहेब आणि डॉक्टर प्रीतमताई मुंडे यांच्या मुळेच मार्गी लागला.वर्तमान लोकप्रतिनिधी यांना तिळाएवढे श्रेय जात नाही.केंद्रात आपलं सरकार आल्यानंतर रात्रंदिवस या प्रश्नासाठी आपल्याच नेतृत्वाने काम केले आणि हा प्रश्न सोडूनच दाखवला.केज विधानसभा मतदार संघात सौ.नमिता ताई मुंदडा यांनी मागच्या सहा वर्षात कोट्यावधी रुपयाची विकास कामे केली.हे कार्यकर्त्यांनी सामान्य जनतेत संपर्क करून समजून सांगायला हवे असे देखील त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.वासुदेव नेहरकर यांनी केले.मंडळ अध्यक्ष भगवान केदार व संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एस.आर.आय.प्रमुख अड.शरद इंगळे यांच्या परिश्रमातून या शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. शिबिराला अपेक्षित सर्व प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# विदर्भ कन्या कु.राजश्री राठोड कास्य पदक प्राप्त या चिमुकलीचा राहुल शिंदे यांनी केला ५१ हजार व शाल श्रीफळ देवुन सत्कार

## होतकरू मेहनती चिकाटी बाज आशा उल्लेखनीय खेळाडूंना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन राहुल शिंदे यांनी दिले

**दैनिक वादळ वार्ता**
**दिग्रस । प्रतिनिधी**

, तालुक्यातील कळसा गावांतील विदर्भकन्या कु.उ राजश्री धनराज राठोड हिने धनुर्विद्या (Archery) या खेळामध्ये आपल्या कळसा गावाचे तसेच देशाचे नाव उंचावत बँकॉक (थायलंड) येथे पार पडलेल्या World Archery Para Series, Asian Para Game 2026 या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये कास्यपदक (Bronze Medal) मिळवुन उल्लेखनीय यश संपादन केले आहे या अभिमानास्पद कामगिरीबद्दल राजश्री हिचा भव्य स्वागत व जाहीर सत्कार सोहळा मा. श्री. राहुलभाऊ शिंदे यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. ✻विदर्भ कन्या कु.राजश्री धनराज राठोड कास्य पदक प्राप्त या चिमुकलीने भारत भर




आपला ठसा उमटवत यश संपादन केले त्या प्रित्यर्थ राहुल जी शिंदे यांनी कळसा जन्मभुमि असलेल्या गावामध्ये कांस्यपदक विजेती राजश्री धनराज राठोड हिला ५१ हजार रोख व शाल श्रीफळ देवुन अभिनंदन व जाहीर सत्कार सोहळा✻करण्यात आला तसेच या यशामागे मार्गदर्शन करणारे राष्ट्रीय प्रशिक्षक सुरेंद्र विठ्ठल राठोड यांचेही विशेष अभिनंदन! करण्यात आले आणि भारतीय सैन्य दलात नव्याने कर्तबगारिने रुजू झालेले कळसा गावातील नवखे तरुण कार्तिक किसवे आणि चेतन जाधव यांचे सुद्धा गावकऱ्यांच्या वतीने आणि राहुल शिंदे यांच्या वतीने स्वागत व मानसन्मान देऊन त्यांचा सुद्धा गौरव करण्यात आला कळसा ग्रामपंचायत अंतर्गत सर्व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिमानाच्या क्षणाचे साक्षीदार होत ही फार गौरवास्पद बाब स्वतहा उपस्थित राहून प्रत्यक्षदर्शी अनुभवली आहे . विदर्भकन्या कु. राजश्री धनराज राठोड हिने धनुर्विद्या (Archery) या खेळामध्ये आपल्या कळसा गावाचे तसेच देशाचे नाव उंचावत बँकॉक (थायलंड) येथे पार पडलेल्या World Archery Para Series, Asian Para Game 2026 या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये कास्यपदक (Bronze Medal) मिळवुन उल्लेखनीय यश संपादन केले आहे या अभिमानास्पद कामगिरीबद्दल राजश्री हिचा भव्य स्वागत व जाहीर सत्कार सोहळा दुर्गामाता मंदिर कळसा येथे संपन्न झाला आहे. या प्रसंगी ग्राम पंचायत कळसा यांच्या वतीने श्री. राहुलभाऊ शिंदे यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता आणी या खेळाडूंना भविष्यामध्ये सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन राहुल शिंदे यांनी दिले आहे. यावेळेस कळसा गावांतील महिला आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृत्तपत्र विक्रेत्याचा मुलगा बनला डॉक्टर (एम.बी.बी.एस.)

**दैनिक वादळ वार्ता**
**परभणी । प्रतिनिधी**

परभणी येथील रहिवासी असलेले शिवाजी उर्फ अंबादास वाकोडे हे परभणी जिल्हा वृतपत्र संघनेचे अध्यक्ष आहेत आणि वृत्त पत्र विक्रीचे काम करून आपला उदर निर्वाह करीत करीत मुलाला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न उराशी बाळगून मुलाला डॉक्टर बनवायचे स्वप्न होते ते प्रत्यक्षात उतरविले येथे अनेक वर्षांपासून वर्तमानपत्र विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील सोमेश छाया शिवाजीराव वाकोडे यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर एम.बी.बी.एस. पदवी संपादन करून डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे.

अत्यंत साध्या व हलाखीच्या परिस्थितीत सोमेश यांनी शिक्षणाचा ध्यास घेतला. कष्टकरी कुटुंबातील मर्यादित साधनसामग्रीतून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीयांसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




डॉ. सोमेश यांचे वडील वर्तमानपत्र विक्रीचा व्यवसाय करत असून आई गृहिणी आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

डॉ. सोमेश वाकोडे यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, त्यांच्या यशाने इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# देगलूर वनपरिक्षेत्रात वन्यप्राण्यांसाठी कृत्रिम पाणवट्यांमध्ये पाणी सोडण्याची मोहीम

**दैनिक वादळ वार्ता**
**बिलोली । प्रतिनिधी**

बिलोली तालुक्यातील उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून वनक्षेत्रातील वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी वन विभागाकडून विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने आज दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी देगलूर वनपरिक्षेत्रात कृत्रिम सिमेंट पाणवट्यांमध्ये टँकरद्वारे पाणी सोडण्याची मोहीम राबविण्यात आली.

ही मोहीम श्रीमती मनीषा पाटील मॅडम, उपवनसंरक्षक नांदेड (खत्रड) व श्री भारत खेळबाडे, सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू व कॅम्पा) नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री रामराव देवकते, वनपरिक्षेत्र अधिकारी देगलूर यांच्या आदेशानुसार पार पडली.

यावेळी श्री अभय सेवलकर, वनपरिमंडळ अधिकारी देगलूर व श्री सहदेव दोसलवार वनरक्षक केरूर यांच्या उपस्थितीत वनपरिक्षेत्र देगलूर अंतर्गत वनपरिमंडळ देगलूरच्या नियतक्षेत्र केरूरमधील मौजे अंजनी, मुतण्याल व केरूर परिसरातील जंगल भागात




असलेल्या कृत्रिम सिमेंट पाणवट्यांमध्ये टँकरच्या सहाय्याने पाणी सोडण्यात आले. उन्हाळ्यात जंगलातील नैसर्गिक पाणीस्रोत आटण्याची शक्यता असल्यामुळे वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे व ते गावाकडे वळू नयेत यासाठी वन विभागाकडून ही उपाययोजना करण्यात येत आहे. या पाणवट्यांमुळे हरण, ससा, रानडुक्कर तसेच इतर वन्यप्राणी यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

वन विभागाने उन्हाळ्याच्या काळात वन्यजीव संरक्षणासाठी अशा प्रकारच्या उपाययोजना सातत्याने राबविण्याचा निर्णय घेतला असून आवश्यकतेनुसार इतर ठिकाणीही पाणवट्यांमध्ये पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती वन अधिकाऱ्यांनी दिली.

# महागाई–गृहिणींचे बजेट कोलमडले देगलूर शहरासह तालुक्यातील चित्र

## मिरचीच्या वाढत्या दराचा बाजारात ठसका!

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर उन्हाळ्यातील लग्न समारंभांना मोठ्या प्रमाणात प्रांरभ झाल्याने शहरांसह ग्रामीण भागातील महिला वर्ग विविध प्रकारच्या उन्हाळी साहित्य तयार करण्याच्या तयारीत व्यस्त आहेत. त्यामध्ये चटणी,पापड, लोणचं,शेवाया, सारख्या नानाविध साहित्याचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यातच मिरचीचे दर दुप्पट झाल्याने चटणीचा ठसका वाढला आहे. पर्यायाने गृहिणींचे स्वयंपाक घरातील बजेट कोलमडलेले दिसत आहे. मागील वर्षापेक्षा चालू वर्षामध्ये मिरचीचे दर चांगलेच कडाडल्याने सर्व सामान्यांच्या डोळ्यात आपुसकीचे पाणी आले आहे. परंतू सध्या मिरचीची आवक कमी व दर दुप्पटीने वाढल्याने गत वर्षीच्या तुलनेत चटणी भलतीच तिखट झाली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महीला वर्गाकडून नाराजी व्यक्त होत आहे. पण त्याला पर्यायच नसल्याने ते मिरची खरेदी करून चटणी



करण्याच्या घाईगडबडीत दिसत आहेत.घरगुती चटणीसह वाळवण करणे झाले महागसध्या उन्हाळी हंगाम सुरू झाला आहे. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस आणखीन वाढत आहे. उन्हामुळे रस्ते ओस पडू लागले आहेत. या उन्हाळी हंगामात ग्रामीण भागातील महिला वर्ग विविध घरगुती साहित्य बनवण्यामध्ये व्यस्त असल्याचे चित्र आहे. यामध्ये प्रामुख्याने घरगुती चटणी ही उन्हाळ्यातच केली जाते. बेगडी,संकेश्वरी, तेल्या, गुंटूर, या जातीच्या मिरच्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. त्याचे दर तर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे महीला वर्गात नाराजी दिसून येत आहे. त्यासाठी लागणाऱ्या मसाल्याच्या दरात २० ते ३० टक्के वाढल्याचे दिसत आहे.४०ते५० टक्के वाढ गेल्या वर्षी मिरचीचे दर हे १५० ते २५० रुपये किलो होते. त्यामध्ये चालू वर्षामध्ये ४० ते ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्या कर्नाटक, तेलंगणा, तसेच महाराष्ट्रातील काही प्रमाणात ग्रामीण भागातून मिरचीचे आवक झाली आहे. अश्या कडक उन्हाळ्यातच चटणीचे कांडप चांगले होते. त्यामुळे वर्षभर पुरेल इतकी चटणी करण्याला प्राधान्य दिले जाते.बाजारात जानेवारी महीण्यापासून नवीन मिरची आवक होत असते. सध्या कडक उन्हाळा सुरू असल्याने त्यातच मिरचीचे दर २०ते ३० टक्क्यांनी वाढल्याने ग्राहकांच्यात चांगलीच नाराजी दिसत आहे. त्यामुळे व्यवसायांवर थोडाफार परिणाम दिसत आहे.

– गौस शेख मिरची विक्रेता देगलूर

# मुखेड येथे कॉंग्रेस पक्षाच्या वतीने पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी संघटन सृजन अभियानास सुरुवात

**दैनिक वादळ वार्ता**
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड कॉंग्रेस पक्षाच्या वतीने संघटन सृजण अभियानाचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रभर आयोजित केलेले असून त्याचाच एक भाग म्हणून मुखेड – कंधार विधानसभा मतदारसंघात या अभियानाची सुरुवात जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष तथा माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या अध्यक्षतेखाली व अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ निरीक्षक ना.हरकरा वेणूगोपालजी,नेते,सुरज तिवारी,प्रदेश कॉंग्रेसचे केदार पाटील साळुंखे,महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड,एकनाथजी मोरे,जिल्हा उपाध्यक्ष राजनजी देशपांडे,महिला कांग्रेसच्या तालुकाध्यक्ष उज्वलाताई पत्रे,युवा नेते अभिजीत पाटील बेटमोगरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाचे निरीक्षक ना.वेणुगोपालजी बोलताना म्हणाले नांदेड जिल्हा हा कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून महाराष्ट्रभर ओळखल्या जात होता,कॉंग्रेस पक्षात असताना ज्यांना केंद्रात व राज्यात पक्षाने मंत्रीपदे दिल्यावरही स्वतःच्या स्वार्थासाठी इतर पक्षात प्रवेश केला.परंतु कॉंग्रेस पक्ष व्यापक विचाराचा पक्ष असून प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे जे पक्ष सोडून गेले ते जाऊ द्या आपण सर्वजण राहुल गांधींना पंतप्रधान म्हणून पाहण्यासाठी जनसामान्याच्या हक्कासाठी कॉंग्रेस पक्षाची ताकद याच संघटन सृजन अभियानाच्या माध्यमातून मोठी करण्याची जबाबदारी आपणा सर्वावर आहे असे सांगितले.

नांदेड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष तथा माजी आमदार बेटमोगरेकर म्हणाले वेणूगोपाल सर हीच समोर बसलेली जनता होती म्हणून मी मागच्या काळात आमदार झालो,लोकांची सेवा करण्याची संधी मला मिळाली,कोण कुठे जातो यापेक्षा आपण याच पक्षात निष्ठेने राहून कॉंग्रेस पक्ष मोठा करण्यासाठी मोठ्या जिद्दीने प्रयत्न करणार असल्याचे पक्ष निरीक्षकासह आजी माजी लोकप्रतिनिधी,पदाधिकारी कार्यकर्त्यासमोर अभिवचन दिले.मात्तबर नेते अशोकराव चव्हाणांनी कॉंग्रेस सोडल्यावर बेटमोगरेकर व नायगावकर घराण्याने या जिल्ह्यातील कॉंग्रेस टिकून ठेवण्यासाठी व दोन वेळेस कॉंग्रेसचा खासदार निवडून आणण्यासाठी खुप प्रयत्नांची पराकाष्ठा केली,याच हणमंतरावांनी अथक परिश्रम घेतले असून येणाऱ्या काळात या भागाचे नेतृत्व जिवंत ठेवायचे असेल,कॉंग्रेसला पुन्हा बळकटी देण्याचे असेल तर हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनाच जिल्हाध्यक्षपदी पुन्हा विराजमान होण्याची संधी दयावी असे मुखेड मायनॉरिटीचे अध्यक्ष शौकतखाँ पठाण यांनी आपल्या भावुक शब्दातून व्यक्त झाले.कॉंग्रेस जिल्हाध्यक्षांच्या



निवडी संदर्भात पक्ष निरीक्षकांनी चाचपणी करण्यासाठी मुखेड येथे आलेले असून जिल्हाध्यक्ष कोणाला करायचे याबाबत प्रत्येक पदाधिकारी आजी–माजी लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांची मुलाखत घेण्यात आली,या मुलाखतीबाबत पक्षनिरीक्षकांनी अत्यंत गोपनीयता बाळगलेली असून मुलाखतीत आलेल्या नावासंदर्भात कुणाच्याही नावाची वाच्यता न करता वरिष्ठांकडे शिफारस करण्यात येईल सदरची निवड प्रक्रिया अत्यंत पारदर्शक असून लोकातून आलेल्या व्यक्तीच्या नावालाच जिल्ह्याचे अध्यक्षपद दिले जाईल असे पक्ष निरीक्षक वेणूगोपालजींनी आपल्या भाषणातून पक्षाची भूमिका विषद केली.

मुखेड येथील जनसंपर्क कार्यालयात पक्षनिरीक्षक ना. वेणूगोपालजी यांचा सत्कार शहर कॉंग्रेसच्या वतीने हणमंत नारनाळीकर यांनी केला.तर प्रमुख मान्यवरांचा सत्कार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केला.या संघटन सृजण अभियानासाठी शहरातून व ग्रामीण भागातून पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हणमंत नारनाळीकर यांनी केले प्रास्ताविक तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर तर आभार जिल्हा युवक कॉंग्रेसचे सरचिटणीस आकाशपाटील ऊंद्रीकर यांनी मानले.या कार्यक्रमास खरेदी विक्री संघाचे माधवराव पाटील वडजे उंद्रीकर,अच्युत पाटील बिल्लाळीकर,पांडुरंग भिकनर सकनुरकर,रमेश तेलंग,मैनुसाब येवतीकर,पंचायत समितीचे माजी सदस्य वसंत पाटील येवतीकर,शादुल पाटील रावणगावकर बालाजी देशमुख भाटापूरकर,गोविंदराव पाटील सुगावकर,गंगाधर गंडमळे मांजरी,अजित वडजे कबनूरकर महादेव सोनकांबळे,माधव हुरजळ शिकारेकर,बेगबाबु धामणगावकर,बाबू पाटील पोले पैसमाळकर,माधव कदम बिल्लाळीकर,प्रवीण मंगसुळी नागराळ,दत्तात्रय पंताडे सुगाव,विठ्ठल बाजगीरे कुंदराळा,विलास पाटील ईमडे शिकारा,सयाजी गजेले चिवळी,बालाजी ठावरे,शिरूर चंद्रकांत जारीकोटे मंग्याळ,मुरलीधर देशमुख कबनूर,लक्ष्मण पाटील बेळीकर,सुरेश नवले,बेटमोगरा,बालाजी बोडके धनज,प्रकाश पाटील लिंगापूर,मारुती टेकाळे खतगाव,सय्यद मुजीप जांब,मारुती पाटील,अविनाश इंगळे पाटील बिल्लाळी,इरफान मोमीन सावरगावकर, माधव गवळे कर्णा,ब्रह्मानंद बोडके धनज,बालाजी बोडके धनज,संजय नुक्कुलवार उच्चा,व्यंकटेश कुणके पाटील जांभळी,जिल्हा कॉंग्रेसचे सहसचिव विश्वंभर पाटील मसलगेकर,भानुदास पाटील बेटमोगरा,उपसरपंच सचिन गुद्दे,धनराज पाटील बेटमोगरेकर,मंगेश पाटील येल्लुरकर,सरपंच नयुम दफेदार,सोशल मिडीया कॉंग्रेस अध्यक्ष तिपणे,शेख रफिक बामणीकर,वृत्तपत्र छायाचित्रकार हाफीजभाई पठाण सह परिसरातील पदाधिकारी कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष नारनाळीकर,युवक कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेश पाटील बेळीकर,तालुका युवक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष एम.आर.गोपणर,युवक कॉंग्रेस जिल्हा सरचिटणीस सुनील पाटील आरगीळे,जिल्हा सेवा दलाचे उपाध्यक्ष विद्याधर साखरे,कॉंग्रेस उपाध्यक्ष बालाजी वाडेकर,उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड सोशल मीडिया शहराध्यक्ष केतन मामडे यांनी परिश्रम घेतले.

# महात्मा फुलेचा शिक्षण विषयक विचार घराघरात गेला पाहिजे प्राचार्य डॉ.बी डी इंगळे

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांचा सामाजिक व शिक्षण विषयक विचार प्रत्येकाच्या घराघरात पोहोचणे आज काळाची गरज झाली आहे कारण शिक्षणाशिवाय कोणत्याही समाजाची प्रगती होऊ शकत नाही पण दुर्दैवाने शिक्षणाकडे आज सरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे सरकारी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असून खाजगी शाळा मोठ्या प्रमाणामध्ये वाढलेल्या आहेत कारण खाजगी शाळा या श्रीमंताच्या झाल्या असून गरिबांना त्या परवडणाऱ्या नाहीत म्हणून शिक्षणासाठी संघर्ष करणे हा विचार घराघरांमध्ये पोहोचणे गरजेचे आहे असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. बी डी इंगळे यांनी प्रा डॉ शंकर गड्डमवार यांच्या निवासस्थानी आयोजित केलेल्या महात्मा फुले यांच्या १९९ व्या जयंतीच्या निमित्ताने अध्यक्षपदावरून बोलत होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नायब तहसीलदार रामराव पांगे व माजी उपमुख्याध्यापक मसो वाघमारे हे होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना प्राचार्य डॉ इंगळे म्हणाले की, शिक्षणाची गंगा घराघरांमध्ये वाहण्यासाठी प्रत्येकाने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे प्रत्येक जण खाजगी शाळेमध्येच गुणवता आहे म्हणून आपल्या पाल्यांना त्याच शाळेमध्ये प्रवेश देत असतील तर बहुजन समाजातील गोरगरिबांच्या ज्या शिक्षण वाहिन्या म्हणजेच सरकारी शाळा ह्या आपोआपच बंद पडतील त्यामुळे आपल्या मुलांना सरकारी नोकरी देखील मिळणार नाही म्हणून प्रत्येकाने ही शाळा वाचवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे तेव्हाच महात्मा फुले यांच्या स्वप्नातील शैक्षणिक क्रांती सफल झाली असे दिसून येईल यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून म सो वाघमारे म्हणाले की इंग्रजी माध्यम शाळेपेक्षा मराठी माध्यमांच्या शाळा हे कधीही उत्कृष्ट दर्जाच्या असतात. मराठी माध्यमाच्या शाळेतून परिपूर्ण अभ्यास असणारे विद्यार्थी बाहेर पडतात म्हणून मातृभाषेतील शिक्षण हे नेहमीच दर्जेदार असते. याप्रसंगी डॉ शंकर गड्डमवार नायगाव मधून नांदेडला शिफ्ट होत असल्यामुळे महात्मा फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने नगरातील सर्वांची खीप व्हावी यासाठी गेट-टुगेदर व जयंती असा संयुक्तिक पण जिव्हाळ्याचा कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी त्यांनीही नेपाळ सरकारने खाजगी शाळा बंद करण्याचा जो निर्णय घेतला तो अतिशय स्तुत्य असून भारत सरकारने हे सर्वांना समान शिक्षण मिळवण्यासाठी फक्त सरकारी शाळेमधूनच सर्वांना शिक्षण मिळावे अशी व्यवस्था करावी असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मल्हारराव तोटरे यांनी केले, प्रा डॉ नागनाथ मनुरे यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने सूत्रसंचालन केले तर भीमराव बैलके यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी बापूराव देवकांबळे, चंद्रकांत डोईवाडे, शंकर पवार, यशवंत डुमणे, होकर्णे सर, शेळके सर,साईनाथ बोरड,हिवराळे सर, परमेश्वर वाघमारे, विठ्ठल उमरे, सौ.कमलबाई गवाले, सौ.अर्चना होणपारखे,सौ. नंदा गड्डमवार,डॉ रुपेश गड्डमवार,कु मोनिका उमरे, कु. माधुरी उमरे, कु सोनाली गायकवाड, कु शितल गायकवाड, चार्वाक गड्डमवार, आदर्श होणपारखे, सचिदानंद बोरड, श्रवण बोरड इ उपस्थित होते.



## जावळी येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मुर्ती प्राणप्रतिष्ठापणा सोहळा संपन्न!

# औशाचे आ.अभिमन्यु पवार यांचे वडील ह.भ.प दत्ताज्य गुरुजी पवार यांच्या हस्ते मुर्ती स्थापणा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील जावळी हे गाव संतांची भूमी व धार्मिक सांप्रदायाचा वारसा लाभलेले गाव म्हणून ओळखले जाते. जावळी येथे खूप पुर्वीपासून प्रत्येक वर्षी अनेक धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात.



खूप वर्षांपासून गावातील भक्तांच्या मनात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मंदिर आपल्या गावात असावे अशी एक इच्छा होती. त्याप्रमाणे आज वरुथिनी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर गावातील सर्व लहान थोर भाविक भक्तांच्या सहकार्याने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मंदिर बांधकाम पूर्ण करण्यात आले व तेथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे शास्त्रोक्त मंत्रोच्चारात विधिवत पूजन करुन भव्य अशा नविन मंदिरात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली.

प्रथमतः श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मुर्ती श्री क्षेत्र पंढरपूर येथून आणून टाळ मृदंगाच्या गजरात व विठु माऊलीच्या जयघोषात, जावळी, मुगळेवाडी, वाघोली, आपचुंदा, जयनगर, किनीनवरे, तांबरवाडी राजेवाडी, लामजना, चलबुर्गा फत्तेपूर येथील भजनी मंडळाच्या वतीने श्रीं च्या मूर्तींची भव्य अशी नगर प्रदक्षणा व शोभा यात्रा काढण्यात आली. त्यानंतर नवग्रह स्थापना, प्रधान देवता होम, धान्यधिवास, नैवद्य आरती असे दैनंदिन कार्यक्रम झाले. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी माता मुख्य प्राणप्रतिष्ठापणा व महापुजन ध्वज स्थापण करण्यात आले.

प्राणप्रतिष्ठापणेनंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मनोभावे महामंगल आरती करुन एकादशीच्या निमित्ताने सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद स्वरुपात फळे वाटप करण्यात आले.व शेवटच्या दिवशी सुंदर अशा महाप्रदाचे आयौजन करण्यात आले आहे यावेळी जावळी गावातील भजनी मंडळ भाविकांसह जावळी ग्रामस्थ उपस्थीत होते

# शेणखत मिळणे झाले कठीण! रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे जमिनीचा सुपीकता धोक्यात

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

खरीप हंगामाच्या तयारीसाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेती मशागतीचे कामे सुरू केली असली तरी पारंपारिक पद्धती ऐवजी यंत्राच्या मदतीने शेती करण्यास अधिक प्राधान्य दिले जात आहे. परिणामी, मागील काही वर्षात पशुधनात मोठ्या प्रमाणात घट झाली असून त्याचा थेट परिणाम शेणखताच्या उपलब्धतेवर होत आहे. रासायनिक खतांचे वाढते दर आणि पशुधनाच्या अभावामुळे शेतीसाठी पोषक ठरणारे शेणखत मिळणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. तालुक्यातील पशुधन घटल्यामुळे शेणखताचा वापर कमालीच्या कमी झाला असून त्यामुळे जमिनीच्या सुपीकतेवर आणि उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

दुसरीकडे, रासायनिक खताचा अतिवापर केल्यामुळे जमिनीचा पोत व सुपीकता ढासळत चालली आहे. पूर्वी ग्रामीण भागात



मोठ्या प्रमाणात पशुधन असल्याने शेणखत सहज उपलब्ध होत होते. मात्र पशुपालनावरील वाढता खर्च आणि त्यातून मिळणारे कमी उत्पन्न यामुळे अनेक शेतकऱ्यांनी पशुधन कमी केले किंवा विक्री केले आहे. यामुळे सध्या शेणखताची टंचाई निर्माण झाली आहे. शेणखताच्या योग्य वापर केल्यास जमिनीत पोत सुधारतो आणि उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याची गरज व्यक्त होत आहे.

०.४ टक्के शेणखतात ०.४ टक्के नत्र,०.१५ टक्के स्फुरद व ०.५० टक्के पालाश असते. त्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहण्यास मदत होते. मानवी आरोग्य धोक्यात वाढत्या रासायनिक खताच्या आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे माती परीक्षण करून आवश्यक घटक योग्य प्रमाणात देण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न करावेत. असा सुधारेल शेतीच्या पोतगोठ्यातील शेणासोबत जनावराचे मूत्र आणि उरलेले चारा तुकडे याचा योग्य उपयोग करून प्रभावी सेंद्रिय खत तयार करता येते. गोठ्याच्या कडेला माती टाकून त्यात मूत्र साठवून ते शेण खताच्या खड्ड्यात मिसळल्यास जमिनीचा पोत सुधारण्यास मोठी मदत होते.

# ग्रामीण पोलीस स्टेशनं येथील पोक्सोच्या गुन्ह्यातील आरोपीची पोनि चिंचोलकर यांनी महिला पोलिसांच्या हातानी काढली धिंड

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

दोन दिवसापूर्वी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील शिवाजी विद्यालयांमध्ये जाऊन एका नववीतील मुलीशी गैरवर्तन करून त्याची छेड काढली होती. प्रज्योतसिग सिद्धू रा.ढाकणी या आरोपीला ग्रामीण पोलिसांनी त्यात तात्काळ पोकसोअंतर्गत गुन्हा दाखल करून फरार आरोपीस डीबी पाथकाने निजामबाद येथून अटक केली. सदर आरोपीवर यापूर्वी पण सोनखेड येथे गुन्हा दाखल आहे. तसेच ग्रामीन पोलिसांनी त्यास सिडको मुख्य मार्केटने फिरवून शाळेमध्ये नेले आणि सर्व विद्यार्थी नागरिक यांना आव्हान केले की सदर आरोपीने इतर कोणासोबत गैरवर्तन केले असल्यास त्याविरुद्ध पोलीस स्टेशनला माहिती द्यावी किंवा समोर यावे त्यावर



अजून गुन्हे दाखल करता येतील.

तसेच कुठल्याही शाळेजवळ क्लासेसला कॉलेजमध्ये कोणीही मुलींची छेडछाड करण्याचा प्रयत्न करत असेल किंवा गैरवर्तन करत असेल तर ११२ वर कॉल करावा महाराष्ट्र पोलिसांची फ्री सुविधा असून दोन मिनिटांमध्ये पोलीस आपल्याला मदत साठी पोहचतील आसे ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी नागरिकांना आव्हान केले.

# प्रवासी सेवा आता अधिक डिजिटल मुखेड आगारात 'एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड' वितरण सोहळा संपन्न!

दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड मतदारसंघातील राज्य परिवहन महामंडळ, मुखेड आगार येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागाच्या वतीने आयोजित 'एनसीएमसी स्मार्ट कार्ड' (NCMC Smart Card) वितरण सोहळ्यात उपस्थित राहून लाभार्थ्यांना स्मार्ट कार्डचे वाटप केले. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना 'स्मार्ट कार्ड'चे महत्त्व आणि त्यातून मिळणाऱ्या विविध फायद्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या महायुती सरकारने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी बस प्रवासात सवलती




देऊन सर्वसामान्यांचे जीवन सुसह्य केले आहे. हे सरकार आणि मी स्वतः आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, ही ग्वाही यावेळी नागरिकांना दिली.

हा महत्त्वाचा उपक्रम मतदारसंघातील प्रत्येक गावागावात राबवावा, अशा सूचना मुखेड आगार प्रमुख माननीय सुभाषराव पवार साहेब यांना दिल्या आहेत.

या कार्यक्रमाचे उत्तम आयोजन केल्याबद्दल नगरपालिका बांधकाम विभाग सभापती हेमंतराव घाटे, नामदेव पाटील शिंदे, सचिनराव घाटे, विजय अरबड आणि प्रविण मोरे यांचे मनापासून अभिनंदन करतो.

डिजीटल इंडियाच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल असून, आपली 'लालपरी' आता अधिक आधुनिक होत आहे!

या प्रसंगी माजी नगराध्यक्ष गंगाधररावजी राठोड, भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व संचालक, सर्व नगरसेवक, नगरसेवक प्रतिनिधी, जिल्ह्यातील व मतदारसंघातील भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आधुनिक भारताचे शिल्पकार या भव्य देखाव्याचे आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते उदघाटन

# परळी भीमवाडी चौकात देशाच्या एकसंघ स्थायीभाव देखाव्याचे ठरले भीमसैनिकांचे आकर्षक

दैनिक वादळ वार्ता
**बीड । विजय रोडे**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने येथील भिमवाडी चौकात आधुनिक भारताचे शिल्पकार या भव्य देखाव्याचे आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थित उदघाटन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते भैयासाहेब आदोडे यांच्या संकल्पनेतुन व स्वखर्चाने प्रतिवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देश व समाजाप्रती दिलेल्या विचारांचे संदेश भव्य देखाव्याच्या माध्यमातून स्वखर्चाने प्रदर्शित केला जातो याही वर्षी बाबांच्या १३५व्या जयंती निमित्ताने शहराच्या भिमवाडी चौकात आधुनिक भारताचे शिल्पकार या शिर्षक घेऊन स्थायी भव्य देखावा उभारण्यात आला आहे.

या देखाव्याचे माजी मंत्री आ.धनंजय मुंडे साहेबांच्या हस्ते रविवार दि.१२ एप्रिल रोजी सायंकाळी मोठ्या उत्साहात करण्यात आले.यावेळी परळी शहराच्या प्रथम नागरिक सौ.पद्मजाताई बाजीराव धर्माधिकारी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तर प्रमुख उपस्थिती उप नगराध्यक्ष राजा खान,माजी उप नगराध्यक्ष शकील भाई कुरेशी, पाणी पुरवठा सभापती रविंद्र (पापा) सेठ गित्ते, श्रीकृष्ण भावड्या कराड, नगरसेवक भीमराव डावरे,अमोल मुरकुटे, अदी मान्यवर उपस्थीत होते.

दरम्यान उपस्थित मान्यवरांच्या चे आभार व्यक्त करताना सामाजिक कार्यकर्ते भैयासाहेब आदोडे यांनी सांगितले कि,भारतातील विविध जाती,परंमपरेला, धर्माला एकसंघ या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या माध्यमातून केले आहे याच संदेशाच्या माध्यमातून हा देखावा निर्माण केला आहे. यामध्ये संविधान हातात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हुभी प्रतिकृती,भारतीय जनतेने आपले लोक प्रतिनिधी निवडून देतात ज्या सभागृहात देशाचे भवितव्य व कायदे केले जातात ती संसद,न्याय दान करणाऱ्या सुप्रीम कोर्टाची प्रतिमा व याला एकसंघ ठेवण्यासाठीचे भारतीय राज्यघटना अशी दृश्य भव्य स्वरूपात उभारण्यात आले असल्याचे भैयासाहेब आदोडे यांनी यावेळी सांगितले.याप्रसंगी जेष्ठनेते विश्वनाथ गायकवाड,जेष्ठ नेते महादेवरी ताटे,वंचित चे नेते मिलिंद घाडगे,सुनील चिकाटे,राहुल गोदाम, रमेश रायभोले, राजेभाऊ मुंडे, विजय व्हावळे, नितीन व्हावळे, प्रवीण दहिवाडे, सचिन गायकवाड,ओम दहिवाडे, विशाल रायभोळे, गौतम दहिवाडे, उत्तम घाटे, आदिल पठाण, पप्पू खान, नोमन सय्यद, बबलू पठाण, सुमित रायभोळे, वैभव भोकरे, आकाश गायकवाड, आदित्य वंजारे, आकाश कांबळे, गणेश गवारे, सोनू ताटे, धम्मापाल सोनकांबळे, अनिकेत ढगे, सलामन पठाण अदी भिमवाडी मित्र मंडळाचे नेते,पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थितीत होते.



# केज येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

## भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाने दिली शिस्तबद्ध मानवंदना

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**





विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त केज शहरात आज उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा व समता सैनिक दल, केज यांच्या वतीने स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसर येथे अभिवादन कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.सकाळी ठीक १० वाजता मुख्य स्मारकाजवळ भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी आणि समता सैनिक दलाचे सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले. कार्यक्रमाची सुरुवात महामानवाच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आणि त्रिशरण-पंचशील ग्रहणाने झाली. यावेळी समता सैनिक दलाच्या सैनिकांनी आपल्या पूर्ण गणवेशात (णपळशेी) शिस्तबद्ध पद्धतीने बाबासाहेबांना सामुदायिक 'मानवंदना'अर्पण केली. भारतीय बौद्ध महासभेचे केज शहर अध्यक्ष जयपाल मस्के यांच्या अध्यक्षतेखाली सर्व कार्यक्रमाचे चोख नियोजन करण्यात आले होते. मुख्य स्मारकावरील अभिवादनानंतर, भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दलाच्या पथकाने शहरातील विविध प्रभागांमधील जयंती उत्सव समित्यांना भेटी दिल्या. प्रत्येक ठिकाणी बाबासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करून मानवंदना देण्यात आली, ज्यामुळे शहरातील वातावरण अधिकच चैतन्यमय झाले होते.या कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभेचे शहर सरचिटणीस शिवकुमार मस्के, कोषाध्यक्ष तथा समता सैनिक चंद्रकांत मस्के, माजी शहराध्यक्ष डॉ. प्रभाकर ठोके, बळीराम सोनवणे, नंदकुमार मस्के, भारत ढालमारे, नवनाथ सोनवणे, राजू घोडके, अजय गालफाडे, कल्याण मस्के, दिपक मस्के, प्रेमकुमार गायकवाड, महिला समता सैनिक ज्योती सोनवणे, मैनाबाई भालेराव तसेच भारतीय बौद्ध महासभेच्या महिला शाखेच्या शहर अध्यक्षा सुनीता कांबळे व सर्व सन्माननीय पदाधिकारी,समाजबांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.समता सैनिक दलाने दाखवलेली शिस्त आणि महासभेच्या पदाधिकाऱ्यांच्या नियोजनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मौजे खडकमांजरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**



तालुक्यातील मौजे खडकमांजरी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. गावातील त्रीरत्न बौद्ध विहार येथे ग्रामस्थांच्या वतीने मुख्य कार्यक्रम पार पडला.

या जयंती सोहळ्यास गावचे सरपंच माधवराव कापसे तसेच पोलिस पाटील गौतम वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी माजी सरपंच श्यामराव वाघमारे, माजी उपसरपंच संतोष वाघमारे, शिवा विद्यार्थी आघाडीचे लोहा तालुकाध्यक्ष राजकुमार पिल्लोळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आत्माराम गायकवाड यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन चांदोबा एडके यांनी केले.

याचबरोबर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक कलणे सर यांनी प्रास्ताविक करत डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचा आदर्श घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. शाळेतील कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आत्माराम गायकवाड यांनी केले.

या कार्यक्रमात पत्रकार विश्वनाथ कांबळे,विकास वाघमारे, माजी ग्रामपंचायत सदस्य दलित वाघमारे, चंद्रकांत वाघमारे,दिनाजी गायकवाड,अनिकेत गायकवाड, प्रदिप वाघमारे,प्रशिक वाघमारे, दिनाजी मेकाले, केशव नरवाडे,आनंदराव एडके,भाऊराव वाघमारे,चरण कापसे,विठ्ठल वारकड,पुंडलिक मेकाले,विकास एडके,रंजन एडके, प्रदिप एडके, चंद्रकांत एडके,राहुल जोंधळे, जगन वाघमारे,नारायण वाघमारे,माधव बडवणे,यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर, समाजप्रबोधन व एकात्मतेचा संदेश देण्यात आला. गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत जयंती सोहळा यशस्वी केला.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आदर्श विद्यालयात वाचन उपक्रम उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विशेष वाचन उपक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले सकाळी साडेआठ ते दुपारी दीड वाजेपर्यंत चाललेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.त्यानंतर बुद्ध वंदना घेतली.यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेल्या लेखनाच्या भिंतपत्रकाचे अनावरण करण्यात आले.पुढे विद्यार्थ्यांनी कादंबऱ्या, लेख व विविधसाहित्याचे वाचन करत ज्ञानसाधनेत स्वतःला रमवले.प्रत्येक विद्यार्थी आपल्या वाचनात तल्लीन झालेला दिसत होता,हे या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य ठरले.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक काकडे बी.के.सर यांची उपस्थिती लाभली.तसेच शिक्षकवृंदामध्ये रोकडे एस.व्ही,मांदळे सर, लोखंडे सर,कापसे सर आणि काळे सर हे उपस्थित होते.विशेष म्हणजे शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसोबत वाचन करून या उपक्रमाला प्रेरणादायी स्वरूप दिले. या उपक्रमामागील मुख्य उद्देश म्हणजे महामानवाची जयंती केवळ औपचारिक न राहता ती ज्ञानार्जनातून साजरी व्हावी हा होता. शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश विद्यार्थ्यां पर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न यशस्वी ठरला.खऱ्या अर्थाने,वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणेच या उपक्रमाने विद्यार्थ्यां मध्ये वाचनाची आवड निर्माण करत ज्ञानाची खरी दिशा दाखवली.

## गप्पेवाडीतील पाणी टंचाईचा प्रश्न ऐरणीवर

# दोन सरकारी पाईपलाईन असूनही बाराभाई व महादेव वस्त्यांवर अन्याय प्रशासनाचा घाणेरडा कारभार?

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील गप्पेवाडी गावात पाण्याचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला आहे.गावामध्ये दोन-दोन सरकारी पाईपलाईन व्यवस्था अस्तित्वात असतानाही बाराभाई वस्ती आणि महादेव वस्ती येथील नागरिकांना आजही पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.विशेष म्हणजे गावाच्या मुख्य भागात मुबलक पाणीपुरवठा होत असताना या दोन वस्त्यांकडे मात्र प्रशासनाचे स्पष्ट दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते,गप्पेवाडी मध्ये जल पुरवठ्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणात निधी खर्च करून पाईपलाईन उभारल्या आहेत.परंतु या पाईपलाईनचा लाभ सर्वांना समान पद्धतीने मिळत नाही.गावातील काही भागात नियमित आणि पुरेसा पाणी पुरवठा केला जातो,तर बाराभाई वस्ती आणि महादेव वस्ती येथील नागरिकांना एकदा पण नळांला पाणी मिळत नाही याकडे सर्वांचे दुर्लक्ष होत आहे. महिलांना दररोज लांब अंतरावरून पाणी आणावे लागते,त्यामुळे त्यांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाया जातात. अनेक वेळा शाळकरी मुलांनाही पाणी भरण्या साठी जावे लागते, त्यामुळे त्यांच्या शिक्षणा वरही परिणाम होत आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे ही समस्या अधिकच वाढली असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.गावातील काही नागरिकांनी सांगितले की,अनेक वेळा ग्राम पंचायत आणि संबंधित विभागाकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र अद्याप ठोस उपाय योजना करण्यातआलेली नाही.पाईपलाईन असूनही पाणी पोहोचत नसल्यामुळे नेमकी अडचण कुठे आहे? याचा शोध घेऊन त्वरित दुरुस्ती करणे आवश्यक आहे,अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान,काही ठिकाणी पाईपलाईनमध्ये गळती, कमी दाबाने पाणी येणे किंवा अनधिकृत जोडणी यांसारख्या समस्या असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या सर्व बाबींची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी,तसेच सर्व वस्त्यांना समान पाणीपुरवठा सुनिश्चित करावा,अशी मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ लक्ष देणे गरजेचे आहे. गप्पेवाडी तील बाराभाई वस्ती आणि महादेव वस्ती येथील नागरिकांना न्याय मिळावा,यासाठी योग्य नियोजन आणि अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा येत्या काळात नागरिकांकडून तीव्र आंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# केजमध्ये श्री परशुराम जन्मोत्सव सोहळ्याचे भव्य आयोजन ; विविध कार्यक्रमांची मांदियाळी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




केज येथील समस्त ब्राह्मण समाज व चतुर्वेद प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री परशुराम जयंती उत्सवाचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले आहे.दि. १८ आणि १९ एप्रिल २०२६या दोन दिवसांच्या काळात विविध धार्मिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, यानिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण आहे.शनिवारी रांगोळी स्पर्धा व रक्तदान शिबीराने उत्सवाची सुरुवात होणार आहे. शनिवार,१८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी दोन गटांत रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. (लहान गट: १० ते १७ वयोगट आणि मोठा गट: १८ ते ४५ वयोगट) याच दिवशी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे ही आयोजन करण्यात आले आहे.हे सर्व कार्यक्रम शुक्रवार पेठ येथील श्री बालाजी मंदिर येथे पार पडणार आहेत.

**रविवारी भव्य मोटारसायकल रॅली**

रविवार १९ एप्रिल२०२६ रोजी दुपारी ३-३० वाजता शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे.ही रॅली वकीलवाडी हनुमान मंदिर येथून सुरू होऊन कानडी रोड कॉर्नर, छत्रपती शिवाजी महाराज चौक,भवानी चौक,मंगळवार पेठ कॉर्नर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,गुंड गल्ली,लोढे गल्ली मार्गे श्री बालाजी मंदिर येथे विसर्जित होईल.

**व्याख्यान आणि सत्कार समारंभ**

रविवार सायंकाळी ५ वाजता श्री भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येईल. त्यानंतर श्री.ह.भ.प. लक्ष्मण महाराज इनामदार (गुरुजी) यांचे 'श्री भगवान परशुराम' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान होणार आहे. व्याख्यानानंतर विविध क्षेत्रात विशेष नैपुण्य मिळवलेले विद्यार्थी आणि नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने होणार आहे.हा जन्मोत्सव सोहळा यशस्वी करण्या साठी समस्त ब्राह्मण समाज व चतुर्वेद प्रतिष्ठान,केजचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.या सर्व कार्यक्रमांना जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077